# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

**सभा क्र.:- ०४ // विशेष महासभा बैठकीचे कार्यवृत्त // दि. ०३/११/२०१८**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि. ०३/११/२०१८ शनिवार रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर, सौ.सिमा सुरेश भोळे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्ट्रमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा. सौ.सिमा सुरेश भोळे, महापौर, तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| जोहरे प्रिया मधुकर | भोईटे लताबाई रणजीत | पाटील रेखा चुडामण |
| नेरकर सरिता अनंत | पाटील प्रतिभा सुधीर | सोनवणे सुरेखा सुदाम |
| पोकळे दिलीप बबनराव | पाटील चंद्रशेखर शिवाजी | ढेकळे सदाशिव गणपत |
| खान रुकसानाबी गबलु | कापसे मयुर चंद्रकांत | पाटील राजेंद्र झिपरु |
| सोनवणे कांचन विकास | देशमुख प्रतिभा गजानन | महाजन सुनिल सुपडू |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | पाटील विजय पुडलिक | महाजन जयश्री सुनिल |
| बाविस्कर किशोर रमेश | सोनवणे सुरेश माणिक | नाईक प्रशांत सुरेश |
| सपकाळे मिना धुडकु | शेख हसीनाबी शरीफ | बालाणी भगतराम रावलमल |
| कोळी दत्तात्रय देवराम | पाटील कुलभुषण विरभान | अत्तरदे रजनी प्रकाश |
| सपकाळे रंजना भरत | भिल पार्वताबाई दामु | काळे रेश्मा कुंदन |
| कोल्हे प्रविण रामदास | पाटील उषा संतोष | आहुजा मनोज नारायणदास |
| सनकत चेतन गणेश | कोल्हे सिंधु विजय | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| सोनवणे भारती कैलास | कोल्हे ललीत विजय | सोनार रंजना विजय |
| चौधरी चेतना किशोर | बरडे नितीन मनोहर | खडके सुनिल वामनराव |
| सोनवणे मुकुंदा भागवत | बेंडाळे उज्वला मोहन | खडके विश्वनाथ सुरेश |
| तायडे ज्योती शरद | राणे गायत्री इंद्रजित | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| लढ्ढा नितीन बालमुकुंद | जोशी अनंत हरिश्चंद्र | देशमुख सुन्नाबी राजु |
| काळे अमित पांडुरंग | तायडे सुरेखा नितीन | शेख सैईदा युसुफ |
| चौधरी मंगला संजय | चव्हाण ज्योती बाळासाहेब | पटेल इब्राहिम मुसा |
| काळे दिपमाला मनोज | मराठे जितेंद्र भगवान | सोनवणे विक्रम किसन |
| पाटील सचिन भिमराव | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | |

सदर सभेस मा.आयुक्त, चंद्रकांत डांगे, मा.उपायुक्त, श्री. चंद्रकांत खोसे, मा.उपायुक्त, श्री.लक्ष्मीकांत कहार, नगरसचिव श्री.सुभाष मराठे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरु करण्याचे निर्देश दिले.

नगरसचिव :- आजच्या सभेकरिता मा.उपमहापौर,डॉ.श्री.अश्विन शांताराम सोनवणे, सन्मा.सदस्य श्री.विष्णू रामदास भंगाळे, श्री.धिरज मुरलीधर सोनवणे व सन्मा.सदस्या सौ.प्रतिभा चंद्रकांत कापसे यांचे रजेचे अर्ज आलेले असून ते मा.पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेले आहेत.

**नगरसचिव :- विषय क्रं.१)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५(२)ब चे तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्याची अर्हता व नियुक्त्या ) सुधारणा नियम १०१२ चे तरतुदीनुसार जळगांव शहर महानगरपालिकेत मान्यता प्राप्त पक्षाचे व गटांचे तौलनिक संख्याबळानुसार प्राप्त पाच जागेसाठीचे नामनिर्देशन व त्याबाबत मा.आयुक्त यांचेकडून येणाऱ्या शिफारशींचा विचार करुन नामनिर्देशीत सदस्यांचे नामनिर्देशनास मान्यता देणे.

नगरसचिव :- जळगांव शहर महानगरपालिका नामनिर्देशित सदस्य निवडीबाबत दि.२२/१०/२०१८ रोजी म.आयुक्त सो यांचे दालनात बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत नवनिर्वाचीत सदस्य संख्यानुसार भा.ज.पा.चे - ४, शिवसेना - १ असे सदस्य घेता येवु शकतील. त्यानुसार दि.२९/१०/२०१८ पर्यंत नामनिर्देशन पत्र दयावीत असे सूचित करण्यात आले. त्यानुसार भा.ज.पा.गटनेते व शिवसेना गटनेते यांनी दिनांक २९/१०/२०१८ रोजी सादर केलेली बंद पाकीटे मा.महापौर महोदया यांचेकडेस सुपूर्द करण्यात येत आहे. (आलेली सर्व नामनिर्देशन पत्र वैध असल्याने स्विकारणेत येत असलेबाबत मा.महापौर यांची सूचीत केले.) आलेली नामनिर्देशनामध्ये १) सोनवणे कैलास नारायण, २) त्रिपाठी विशाल राधेश्याम, ३) मराठे राजेंद्र नारायण, ४) चौधरी महेश रतन व ५) जैन भागचंद मोतीलाल यांची नामनिर्देशन पत्र प्राप्त झालेली आहेत.

श्री.नितीन लढ्ढा :- जळगांव शहर महानगरपालिका नामनिर्देशित सदस्य पदासाठी प्राप्त झालेले सर्व पाच ही सदस्यांना जळगांव शहर महानगरपालिकेचे नामनिर्देशित सदस्य म्हणून नियुक्त करणेस मान्यता देणेत यावी.
श्री.ललित कोल्हे :- सन्मा.सदस्य श्री.नितीन लढ्ढा यांनी केलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.
नगरसचिव :- सभागृहाने मान्यता दिल्यानुसार १) सोनवणे कैलास नारायण २) त्रिपाठी विशाल राधेश्याम, ३) मराठे राजेंद्र नारायण, ४) चौधरी महेश रतन, व ५) जैन भागचंद मोतीलाल यांची जळगांव शहर महानगरपालिकेचे नामनिर्देशीत सदस्य म्हणुन नियुक्ती करण्यात येत आहे. सर्व नवनिर्वाचित नामनिर्देशित सदस्यांचे प्रशासनातर्फे हार्दीक अभिनंदन करण्यात येत आहे तरी मा.महापौर, म.आयुक्त सो यांनी सदस्यांचा सत्कार करावा ही विनंती. सर्व गटनेता यांना विनंती आहे की, त्यांनी व्यासपिठावर यावे.

*** (मा.महापौर, म.आयुक्त सो तसेच सर्व सर्व गटनेता यांनी सर्व नवनिर्वाचित नामनिर्देशित सदस्यांचे स्वागत केले.)**

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.२८ पारित करण्यात आला.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५(२) (ब) तसेच महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांच्या अर्हता व नियुक्त्या ) सुधारणा नियम २००७ व २०१२ चे नियम ४ व ५ मधील तरतुदीनुसार आयुक्त यांनी सभागृह नेता व सर्व गटनेत्याची दि २२/१०/२०१८ रोजी मिटींग घेऊन तसेच महासभेत नियम ४ मधील वेगवेगळया विकल्पातुन नामनिर्देशित सदस्यांचे नियुक्तीबाबत प्रयत्न केले. शेवटी पक्षीय बलाबलानुसार गटनेत्यांच्या शिफारशीसह प्राप्त नामनिर्देशनातून नियम ४ चे ‘ छ ’ नुसार पाच नामनिर्देशनाची मा.आयुक्तांनी यांनी सभेत शिफारस केलेनुसार खालीलप्रमाणे नामनिर्देशीत सदस्यांचे नियुक्तीस मान्यता प्रदान करणेंत येत आहे.

| अ.क्र. | नामनिर्देशित सदस्याचे नांव | सदस्याचा पत्ता | पक्ष / आघाडी | नियम ४ नुसार विकल्प व पद |
|---|---|---|---|---|
| १. | कैलास नारायण सोनवणे | बालाजी पेठ, बालाजी प्लाझा, जळगांव | भा.ज.पा. | छ - समाजाधिष्ठीत अशासकीय संघटनेचा पदाधिकारी |
| २. | विशाल राधेश्याम त्रिपाठी | ३१, बालाजी पेठ, जळगांव | भा.ज.पा. | छ - समाजाधिष्ठीत अशासकीय संघटनेचा पदाधिकारी |
| ३. | राजेंद्र नारायण मराठे | ३४७, शिवनेरी, शिवाजी नगर, जळगांव | भा.ज.पा. | छ - समाजाधिष्ठीत अशासकीय संघटनेचा पदाधिकारी |
| ४. | महेश रतन चौधरी | ८, डेंबला कॉलनी, रिंगरोड, जळगांव | भा.ज.पा. | छ - समाजाधिष्ठीत अशासकीय संघटनेचा पदाधिकारी |
| ५. | भागचंद मोतीलाल जैन | प्लॉट नं.३१,३२ शंकरआप्पा नगर, पिंप्राळा,जळगांव | शिवसेना | छ - समाजाधिष्ठीत अशासकीय संघटनेचा पदाधिकारी |

सर्वानुमते मंजुर

सुचक :- लढढा नितीन बालमुकूंद

अनुमोदक :- कोल्हे ललित विजय

सामुहीक राष्ट्रगीत गायनानंतर सभेचे कामकाज संपन्न झाले.

**सही/-**

**(भोळे सिमा सुरेश)**

**महापौर**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**